Literacy for a Billion

Movie: Aajoba Vayat Aale
Year: 2011

Song: Hey Mastit Firu
Lyricist:

हे मस्तीत फिरू नाचूया
बेधुंद गाणे गाऊया
हे मस्तीत फिरू नाचूया
बेधुंद गाणे गाऊया
स्वच्छंद जीणे जगूया
ज्वानी असे ही न्यारी
हे मस्तीत फिरू नाचूया
बेधुंद गाणे गाऊया
मस्तीत फिरू नाचूया
बेधुंद गाणे गाऊया

ज्वानी असे ही दोन दिसांची
मस्ती काही क्षणांची
संपेल जोश हा सरेल धुंदी
करा तयारी मनाची
ध्येय असावे सृजनांचे
घेऊ सृष्टीचा हा सूर
हे मस्तीत फिरू नाचूया
बेधुंद गाणे गाऊया
मुठीत घेऊ निसर्ग अवघा
झुकवू दुनिया सारी
पाऊल आमचे मदमस्त हे
चला जग जिंकूया

सहज पेलवूया आभाळाला
सृष्टी सारी नमवूया
हे मस्तीत फिरू नाचूया
बेधुंद गाणे गाऊया

हा निसर्ग आणि तुम्ही
हा निसर्ग आणि तुम्ही
नाही वेगळे कुणी
आभाळातील शांत पोकळी
गायी अभंगवाणी
तुझ्याच रूपे मी अवतरलो
होऊ एकरूप आम्ही
होऊ एकरूप आम्ही
दिली आम्हांला नवी तुम्ही
ही सृजनांची हो दृष्टी
करूया नंदनवन भूमीचे
गाऊ एकीची गाणी
हे मस्तीत फिरू नाचूया
बेधुंद गाणे गाऊया
स्वच्छंद जीणे जगूया
सृष्टी आम्हां ही प्यारी
सृष्टी आम्हां ही प्यारी
सृष्टी आम्हां ही प्यारी

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*